दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक ९४ वा शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# एससी एसटी चे उपवर्गीकरण रद्द करा,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट्स फोरम, लातूर च्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती महामहीम यांना निवेदन.

लातूर :- एससी एसटी चे उपवर्गीकरण रद्द करा,डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲडव्होकेट्स फोरम, लातूर च्या वतीने जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती महामहीम यांना निवेदन भारतीय राज्यघटनेने अनुच्छेद ३४१ अन्वये अनुसूचित जाती आणि जमाती समुदायांना त्यांच्या सामाजिक स्थितीच्या उन्नतीसाठी काही आरक्षण धोरण दिले आहे, ज्याचा लाभ देऊन. देशातील एससी आणि एसटी समाजाला आरक्षणाची तरतूद करून त्यांचा सामाजिक-शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय आहेत, परंतु सामाजिक स्थितीहे समाजघटक अद्याप पूर्णपणे भारदस्त झालेले नाहीत. सामाजिक वस्तुस्थिती अशी आहे की आजही एससी आणि एसटी समाजातील लोकांची उच्चवर्णीयांकडून बदनामी केली जाते कारण या मागासलेल्या समाजातील लोकांची सामाजिक स्थिती खालावली आहे.

पुढे असे सादर करण्यात आले आहे की, आरक्षणाच्या तरतुदींचा लाभ घेतलेल्या काही जातींच्या प्रगतीमुळे आर्थिक परिस्थिती वाढली आहे, परंतु तरीही उच्च जातींद्वारे त्यांचे सामाजिक शोषण केले जाते. सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या निकालात नोंदवलेले निरीक्षण असे आहे की, एससी आणि एसटी च्या काही जातींच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीच्या अभावामुळे, आरक्षणाचा लाभ अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गातील उर्वरित जातींना वाढवला गेला नाही, म्हणजे आपल्या संविधानाच्या तरतुदीनुसार अयोग्य. या समाजांना आरक्षण देण्यामागचा उद्देश लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाचे अ, ब, क आणि ड अशा प्रकारे वर्गीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच समाजातील सदस्यांना क्रिमी लेयर प्रणाली लागू करण्याची सूचना केली आहे. एससी आणि एसटी प्रवर्गातील





प्रगत जाती. त्यानुसार माननीय सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी वरील संदर्भित दिवाणी अपीलावर निर्णय दिला आहे.

या निर्णयामुळे एससीमध्ये तेढ निर्माण होणार आहे. आणि एसटी समाज आणि समाजात फूट पाडणे जे आपल्या देशाच्या कायदा आणि सुव्यवस्थेसाठी चांगले नाही. त्यामुळे एससी आणि एसटी प्रवर्गातील समाजात तेढ निर्माण होईल. अनुच्छेद ३४१ नुसार आपल्या भारतीय संविधानाने भारताच्या राष्ट्रपतींना पूर्ण अधिकार दिलेला आहे, एससी आणि एसटी समुदायाबाबतचे वेळापत्रक तयार करण्याचे अधिकार विशेषत: भारताच्या माननीय राष्ट्रपतींकडे आहेत. या अधिकारांमध्ये इतर कोणत्याही प्राधिकरणाचा हस्तक्षेप नाही. शिवाय पुढे असे सादर करण्यात आले आहे की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती समाजाच्या अनुसूचीमध्ये नवीन श्रेणी तयार करण्याचे अधिकार देखील भारताच्या राष्ट्रपतींच्या अखत्यारीत येतात. ही वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा भारताच्या राष्ट्रपतींच्या अधिकारांचे आणि अधिकारांचे उल्लंघन आहे. त्यामुळे भारताच्या माननीय राष्ट्रपतींनी या निकालाचे पुनरावलोकन करणे आणि त्यात हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. आम्ही नम्रपणे निवेदन करतो की, एस सी आणि एस टी समाजाचे आरक्षणामध्ये वर्गीकरण करण्याच्या आणि क्रिमी लेयरची अट लादण्याच्या निर्णयाचा संवैधानिक अधिकार वापरून पुनर्विचार करण्यात यावा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर डवोकेट फोरम लातूर यांच्या वतीने जिल्हाधिकारी लातूर यांच्यामार्फत महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांना सदर उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे म्हणून निवेदन देण्यात आले यावेळी अध्यक्ष ॲड. लहुजी सूरवसे, सचिव ॲड. गणेश मधुकर कांबळे, सहसचिव ॲड. उद्धव कांबळे, ॲड. राजकुमार गंडले ॲड. दीपक साठे, ॲड. महेंद्र इंगळे, ॲड. शिवकुमार बनसोडे,ॲड. रोहित सोमवंशी, ॲड. सुभेदार मादळे, ॲड. प्रशांत गायकवाड, आदी फोरमचे सर्व सदस्य उपस्थित होते..

# वाहतूक नियमांचे पालन होण्यासाठी दंडात्मक कारवाईसोबत जनजागृतीवर भर द्यावा-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

लातूर :- रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. यासाठी वाहतूक पोलीस आणि परिवहन विभागाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक कारवाईचे प्रमाण वाढविण्यासह जनजागृतीवर भर देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज येथे दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय चव्हाण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभागीय नियंत्रक अश्वजीत जानराव, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेचे असिफ खैराडी, वाहतूक पोलीस निरीक्षक गणेश कदम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.




शहरी भागामधील वाहतूक सुरळीत होण्यासाठी वाहनधारकांनी वाहतूक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावरच वाहने, ऑटोरिक्षा थांबल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होते. तसेच रस्ता ओलांडताना वाहन धारकांकडून नियमांचे पालन होत नसल्याने अपघात होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी. तसेच वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवावेत. रस्त्यावर जागोजागी वाहतुकीबाबत दिशादर्शक फलक लावले जावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

लातूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गांवर वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात. यासाठी लातूर शहर महानगरपालिका, परिवहन विभाग, वाहतूक पोलीस आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त पाहणी करून उपाययोजनांची अंमलबजावणी करावी, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

लातूर जिल्ह्यातील, तसेच शहरातील मार्गांवरील वाहतूक सुरक्षित आणि सुरळीत होण्याच्या अनुषंगाने विविध बाबींवर या बैठकीत चर्चा करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. शेख यांनी विविध विभागांमार्फत आतापर्यंत करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली.

# हजारोंच्या संख्येने ओबीसी मेळाव्यास उपस्थित रहा - ॲड.माधवराव कोळगावे

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांची उपस्थिती

चाकूर /सुशिल वाघमारे :- चाकूर अहमदपूर मतदार संघातील ओबीसी समाजाचा दि.१८ सप्टेंबर रोजी अहमदपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात सकाळी अकरा वाजता ओबीसी आरक्षण जनजागृती महामेळावा आयोजित करण्यात आला आहे.

चाकूर अहमदपूर मतदार संघातील सर्व पक्षांतील ओबीसी समाजाचे कार्यकर्ते,समाज बांधव एकत्र येऊन हा मेळावा घेण्यात येणार असल्याची माहिती ॲड.माधवराव कोळगावे यांनी पत्रकार परिषदेत दिली. दि.१० सप्टेंबर रोजी चाकूर तालुक्यातील लातूररोड येथे ओबीसी समाजातील सर्व समाज बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीत अहमदपूर येथे ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ओबीसी आरक्षण जनजागृती मेळाव्याचे सुक्ष्म नियोजन करण्यात आले.यावेळी वेगवेगळ्या गावातील समाज बांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन स्वखर्चाने या मेळाव्यास स्वतः येणार व इतरही ओबीसींच्या नागरीकांना या मेळाव्याला घेऊन येणार असल्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ओबीसी समाजाच्या वतीने पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी ओबीसी नेते लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी आंदोलन केले होते.



त्यांनी केलेल्या आंदोलनाच्या लढ्याला पाठींबा देण्यासाठी अहमदपूर येथे हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यात ओबीसी समाज एकत्र करून ओबीसी समाजाच्या शैक्षणिक, राजकीय व ओबीसींच्या संघटनासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे ड.कोळगावे यांनी सांगितले.या मेळाव्यास चाकूर तालुक्यातील आठ ते दहा हजार ओबीसी समाज येतील असा विश्वास बैठकीत समाज बांधवांनी व्यक्त केला आहे. यावेळी,गणेश हाके,लातूर जिल्हा बँकेचे संचालक एन.आर.पाटील, सुरेश हाके,गंगाधर केराळे,सुरेश मुंडे,अशोक कर्डिले,माधव भिंगोले,मधुकर मुंडे,राम खंदाडे, अशोक चिंते,नामदेव मांडूरके,विकास सुगावकर,अशोक शेळके, सरपंच दत्ता बद्दे, सरपंच सुनील केसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ सरकट पंचनामे करावे

## आ. निलंगेकरांची मुख्यमंत्र्यांसह जिल्हाधिकाऱ्याकडे निवेदनाद्वारे मागणी

लातूर /प्रतिनिधी :- निलंगा विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यात गत काही आठवड्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी व सततचा पाऊस झाला आहे. या पावसामुळे सोयाबीनसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असून काही पिकांवर रोगांचाही प्रादुर्भाव झाला आहे. या परिस्थितीमुळे शेतकजयांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. परिणामी शेतकरी हतबल झाला असून आता त्यांना आधारासह मदतीची गरज आहे. त्यामुळेच नुकसान झालेल्या पिकांचे सरसकट तत्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह जिल्हाधिकाजयांकडे निवेदनाद्वारे माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे.



यावर्षी मान्सून वेळेवर हजेरी लावली होती.त्यामुळे खरीप पिकांची पेरणीही वेळेवरच झाली होती. मात्र नंतरच्याकाळात लातूर जिल्ह्यासह निलंगा विधानसभा मतदारसंघात अतिवृष्टी व सततचा पाऊस झालेला आहे. परिणामी सोयाबीनसह इतर पिकांवर यलो मोझॅक व इतर रोगांचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात झाला आहे. सततच्या पावसाने तर पिके पिवळी पडत असून आता ती हाती लागण्याची शक्यता कमी आहे. तर काही ठिकाणी सोयाबीनची पिके पाण्यात गेल्यामुळे त्याचेही मोठ्या प्रमाणात नासाडी झालीआहे. या परिस्थितीमुळे शेतकजयांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाणार आहे. सदर परिस्थितीने शेतकरी खचला गेला असून त्यांना आधाराची व मदतीची गरज आहे. ही बाब लक्षात घेवूनच नुकसान झालेल्या पिकांचे तत्काळ सरसकट पंचनामे करून त्यांना मदत मिळण्यासाठी संबंधितांना सूचना करावी अशी मागणी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्यासह जिल्हाधिकारी वर्षा घुगे-ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी निलंगा विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जी एम अंबर यांची पुरवठा निरीक्षकपदी पदोन्नती मिळाल्याबद्दल अशोक हनवते यांनी केला सत्कार

लातूर :- लातूर तहसील कार्यालयात अव्वल कारकून या पदावर कार्यरत असलेले अतिशय शांत, मनमिळावू स्वभाव, पारदर्शक, कर्तव्यदक्ष, असलेले गजानन महावीर अंबर यांची लातूर तहसील कार्यालयातच लातूर तालुका पुरवठा निरीक्षक म्हणून पदोन्नती मिळाल्याचे आदेश येतात अनेक पक्ष, संघटना यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या, १२ सप्टेंबर रोजी अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर , बी आर कांबळे, गोडाऊन व्यवस्थापक लातूर, किशोर भाऊ गायकवाड अध्यक्ष लातूर जिल्हा स्वस्त धान्य दुकानदार असोसिएशन, यांनी शाल,फेटा पुष्पगुच्छ, पेढे वाटून सत्कार करण्यात आले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.



## संपादकीय....

# तिसरी आघाडी ?

महाराष्ट्राच्या विद्यमान राजकारणामध्ये सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकावर बसलेली महाविकास आघाडी यांच्यामध्ये राजकीय ध्रुवीकरण झाले असतानाच राज्यामध्ये तिसरी आघाडी निर्माण करून मतदारांना अजून एक पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत हालचाली सुरू आहेत. देशाच्या राजकारणाला तिसरी आघाडी हा प्रकार जरी नवा नसला, तरी महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये दीर्घकाळ अशा प्रकारची कोणतीही तिसरी आघाडी अस्तित्वात नव्हती. दोन प्रमुख आघाड्यांमध्येच दीर्घकाळ विधानसभा आणि लोकसभेची लढाई लढली जात होती. आता मात्र तिसर्या आघाडीची चर्चा सुरू झाली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ही चर्चा फक्त माध्यमांमध्ये नाही, तर या तिसर्या आघाडीचा भाग होऊ पाहणार्या काही नेत्यांनीसुद्धा स्पष्टपणे तसे संकेत दिले आहेत. कोल्हापूरचे संभाजीराजे छत्रपती यांची स्वराज्य संघटना आणि प्रहार संघटनेचे बच्चू कडू, शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांच्या पुढाकाराने हा तिसर्या आघाडीचा प्रयोग रंगण्याचे संकेत मिळत आहेत. काही दिवसांपूर्वी संभाजीराजे छत्रपती यांनी जालना येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली होती. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी अत्यंत स्पष्ट शब्दामध्ये तिसर्या आघाडीचा आमचा विचार सुरू असून त्यामध्ये मनोज जरांगे येतात का याची चाचपणी करण्यासाठी आम्ही आलो होतो, असे सांगितले होते. गेल्या वर्षभराच्या कालावधीपासून मराठा आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे पाटील यांनी यावेळी आरक्षण मागणी मान्य नाही झाली तर सत्ताधारी आघाडीच्या आमदारांना विधानसभा निवडणुकीत पाडण्याची धमकी दिलीच आहे. शिवाय अधूनमधून ते सक्रिय राजकारणात उतरण्याची घोषणाही करत असतात. दुसरीकडे अद्यापही महायुतीचा भाग असलेल्या पण नाराज असलेल्या बच्चू कडू यांचा महायुतीबाबत भ्रमनिरास झाल्याने त्यांनीसुद्धा तिसरी आघाडी करण्याबाबत सूतोवाच केले आहे. शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनाही महाविकास आघाडी असो किंवा महायुती असो यांच्याबाबत कोणतीही सहानुभूती नसल्याने त्यांनीही तिसर्या आघाडीमध्ये सहभागी होण्याबाबत अनुकूलता दर्शवली आहे. सध्या तरी तिसर्या आघाडीचा पर्याय म्हणून हे सर्व नेते समोर दिसत असले, तरी नजीकच्या कालावधीमध्ये प्रकाश आंबेडकर यांचा वंचित विकास आघाडी किंवा एमआयएम या पक्षांनासुद्धा तिसर्या आघाडीमध्ये सहभागी केले जाऊ शकते. मनोज जरंगे पाटील तिसर्या आघाडीचा भाग होणार असतील तर मी त्या आघाडीत सामील होणार नाही, असे जरी प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्टपणे सांगितले असले तरी आजपर्यंतचा इतिहास पाहता त्यांची भूमिका बदलू शकते. एमआयएमच्या नेत्यांनी खरेतर आपल्याला महाविकास आघाडीमध्ये स्थान मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. पण महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून त्याबाबत अद्याप कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने हा पक्षसुद्धा तिसर्या आघाडीचा पर्याय निवडू शकतो. तिसर्या आघाडीचे यावेळचे हे प्रयत्न निश्चितच ठाम आणि गंभीर असल्याची जाणीव राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनाही झाली असल्यानेच त्यांनी छोट्या छोट्या पक्षांना महाविकास आघाडीमध्ये सामील केले जावे अशी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये गेल्या काही कालावधीमध्ये जे राजकीय ध्रुवीकरण झाले आहे आणि त्यानिमित्ताने जो काही राजकीय गोंधळ वाढीस लागला आहे त्यामध्ये जर मतदारांना अजून एक पर्याय उपलब्ध झाला, तर कदाचित मतदार तसा पर्याय निवडू शकतात ही जाणीव शरद पवारांसारख्या महाराष्ट्रातील अनेक नेत्यांना असणार आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिसरी आघाडी जर निर्माण झाली तर त्याचा सर्वात जास्त फटका महायुतीपेक्षाही महाविकास आघाडीलाच बसणार आहे, हे उघड आहे. या व्यतिरिक्त राज्यात तिसर्या आघाडीचा भाग न होणारे जे इतर पक्ष आहेत किंवा अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतर उमेदवारी न मिळाल्यामुळे बंडखोरी करणारे काही अपक्ष उमेदवारही असणार आहे. याचाही विचार या प्रमुख आघाड्यांना करावा लागणार आहे. राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेना असो किंवा आम आदमी पार्टी असो असे काही पक्ष तिसर्या आघाडीत न येतासुद्धा एखाद्या आघाडीचा खेळ बिघडवू शकतात याची जाणीव अनेक नेत्यांना आहे. राज्यातील राजकारणाचे ध्रुवीकरण झाल्याच्या कालावधीमध्ये राज्यातील डाव्या पक्षांकडे सर्वांचेच दुर्लक्ष झाले आहे. तिसर्या आघाडीचा प्रयोग प्रत्यक्षात आला, तर डावे पक्षसुद्धा या आघाडीमध्ये सहभागी होऊ शकतात आणि त्याचाही मोठा परिणाम विधानसभा निवडणूक निकालावर होऊ शकतो. विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्रकारांनी अशा संभाव्य तिसर्या आघाडीबाबत विचारले असताना त्यांनी कदाचित राज्यामध्ये चौथी आघाडीसुद्धा निर्माण होऊ शकते अशा प्रकारचे विधान केले आहे, हेसुद्धा या ठिकाणी महत्त्वाचे आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांच्या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील मतदारांनी राज्यामध्ये ज्या प्रकारचे राजकारण पाहिले आहे ते पाहता एखादा सक्षम पर्याय मिळाला, तर तो मतदारांना हवाच आहे हेसुद्धा या ठिकाणी नाकारून चालणार नाही. याची जाणीव महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांनाही असल्याने कदाचित विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपापल्या आघाड्या अधिक घट्ट करण्याच्या आणि मतभेद कमी करण्याच्या भूमिकेत आता या आघाड्या शिरल्या आहेत. सध्या तरी तिसर्या आघाडीची फक्त चर्चा सुरू आहे.

# ब्रिटिश वाईट होते का ?

नर बळी जो की शूद्रांचा दिला जात असे.हे थांबवण्यासाठी ब्रिटिशांनी १८३० मध्ये कायदा केला. ब्राह्मण न्यायाधिशास बंदी इ.स.१९१९ मध्ये इंग्रजांनी ब्राह्मणांना न्यायाधीश बनण्यास बंदी घातली होती, त्यांचे चारित्र्य न्यायिक नाही असे इंग्रजांनी सांगितले होते. शासनामध्ये ब्राह्मण राज्यकारभारावर ब्राह्मणांचे १००% नियंत्रण होते. ब्रिटिशांनी त्यांना २:५% वर आणून ठेवले. संपत्ती अधिकार इंग्रजांनी शूद्रांना १७९५ मध्ये कायदा ११ अन्वये मालमत्तेचा अधिकार दिला होता. देवदासी प्रथा ही प्रथा इंग्रजांनीच बंद केली, पूर्वी शूद्र समाजातील मुली देवदासी म्हणून देवळात राहत होत्या,पांडा-पुजारी त्यांच्यावर लहान वयातच बलात्कार करू लागले आणि त्यांच्यापासून जन्माला आलेल्या मुलाला हरिजन म्हणत. नवविवाहित शुध्दीकरण प्रथा १८१९ पूर्वी,जर एखादी शूद्र विवाहित असल्यास, ब्राह्मण नवविवाहित जोडप्यांना शुद्ध करण्यासाठी ३ दिवस त्यांच्याकडे ठेवत असत, त्यानंतर ते त्यांना घरी पाठवत असत, ही प्रथा ब्रिटिशांनी १८१९ मध्ये बंद केली. चरक पूजा ब्रिटीशांनी १८६३ मध्ये बंद केले, ज्यामध्ये असे होते की जेव्हा पूल किंवा इमारत बांधली जाते तेव्हा बांधकामाच्या पायाखाली शूद्रांचा बळी दिला जातो. गंगादान प्रथा ब्राह्मण शूद्रांचा पहिला मुलगा गंगेला दान करायचे, कारण त्यांना माहित होते की पहिला मुलगा बलवान आहे, म्हणूनच ते त्यांना गंगेत दान करायचे,ही प्रथा बंद करण्यासाठी ब्रिटिशांनी १८३५ मध्ये कायदा केला. खुर्ची अधिकार इंग्रजांनी १८३५ मध्ये शूद्रांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार दिला होता, याआधी शूद्रांना खुर्चीवर बसता येत नव्हते. शिक्षणाचा हक्क इंग्रजांनी सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. पूर्वीच्या शूद्र जाती (आजच्या ओबीसी,एससी,एसटी) आणि सर्व जातीच्या स्त्रियांना लिहिण्या वाचण्याचा अधिकार नव्हता. शासकीय सेवा मध्ये प्रतिनिधी इंग्रजांनी भारत सरकारच्या कायद्याद्वारे शूद्र वर्णाच्या जातींना सरकारी सेवांमध्ये प्रतिनिधित्व देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे शूद्र/अतिशुद्र जातींचे हित लक्षात घेऊन इंग्रजांनी अनेक सामाजिक- आर्थिक आणि राजकीय सुधारणा केल्या,पहिला भारत कायदा, दुसरा भारत कायदा,अखेरीस संविधान बनवण्यात इंग्रजांचा फार मोठा वाटा होता.महात्मा ज्योतिबा फुले यांनी तर इंग्रज शुद्र/अति शुद्रांसाठी मसीहा बनून आले आहेत,असे म्हटले होते. =ख यामुळेच ब्राह्मणांनी ब्रिटीशांच्या विरोधात राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळ सुरु केली आणि शूद्र,अतिशुद्रांना परत गुलाम करण्यासाठी १९२० मध्ये ब्राह्मण महासभा, १९२२ मध्ये हिंदू महासभा आणि १९२५ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (ठड्ड) स्थापन केला.त्यामुळे आजही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांस्कृतिक चळवळीमुळे ब्राह्मणांच्या श्रद्धा,परंपरा,विधी,सण,व्रत आणि धर्मग्रंथ यांचा समाजावर पूर्वीसारखाच परिणाम होत आहे. संवैधानिक लोकशाही व्यवस्थेमुळेच बहुसंख्य सामान्यज्ञानी लोक दिसत नाहीत. आज शूद्र (ओबीसी), अतिशुद्र (एससी) आदिवासी (एसटी) या शिक्षित लोकांचा असा विश्वास आहे की मानवी बलिदान,पशुबळी,सती प्रथा, देवदासी,नियोग प्रथा इत्यादी हिंदू (ब्राह्मण) सनातन धर्मातील जुन्या गोष्टी आहेत. ब्राह्मण आता आपल्याला फसवू शकत नाहीत. असे सुशिक्षित लोक हे विसरतात की आजही अशा सुशिक्षितांना प्रत्येक दगडात देव दिसतो, गाय आईच्या रूपात दिसते,निर्मल बाबांच्या लाल हिरव्या चटणीत कृपा दिसते, आसाराम बापूंसारखे ढोंगी त्यांना संत मानतात,ब्राह्मण प्रत्येक संस्कार करतात, ज्योतिषावर विश्वास ठेवतात. ब्राह्मण जे उपाय सांगतात त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवतात,जे मागतात त्यापेक्षा जास्त देतात, तर विज्ञान (वैज्ञानिक) सुईपासून विमानापर्यंत त्यामुळे आज विज्ञानाचे युग आहे, मानवाधिकार संविधानाने दिले आहेत असे मानणे, आता ब्राह्मण करू शकत नाही.मूर्ख बनणे त्यामुळे विशेषतः सुशिक्षितांनी चुकीच्या गैरसमजात राहू नये;जगासाठी विज्ञानाचे युग असेल,पण आजही भारतासाठी ब्राह्मणांचे युग सुरू आहे.हिंदू धर्माच्या नावाखाली मागास समाज, दलित समाजाची फसवणूक केली जात आहे,हिंदू धर्म म्हणजे ब्राह्मणी व्यवस्था हेच वास्तव आहे.=खज्या धर्मात समता, मानवता आणि बंधुत्वाची भावना नाही तो धर्म नसून, षडयंत्र आहे.हे जितक्या लवकर समजेल तितके तुमच्या आयुष्यासाठी चांगले होईल.

******

युवराज रामटेके

# शिका संघर्ष करा आणि संघटित व्हा !

हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचा वसा घेतलेले अत्यंत गरीब परिस्थितीवर मात करत आपल्या स्वतः च्या आत्मविश्वासाच्या बळावर प्रगतीच्या उंच शिखरावर पोहोचलेले समाज भूषण, उद्योजक आदरणीय संतोषभाऊ वाकोडे म्हणजे संघर्षातून निर्माण झालेलं एक आगळ वेगळं आदर्श व्यक्तिमत्व होय संतोष भाऊ वाकोडे आज १३ सप्टेंबर यांच्या वाढदिवसानिमित्ताने त्यांचे कार्य आणि कर्तुत्वाचा लेखाजोखा एखाद्या लघु चित्रपटासारखा डोळ्यासमोर येतो. संतोष भाऊ यांना कुठल्याही प्रकारचा नावलौकिक असा कौटुंबिक वारसा लाभलेला नसताना सुद्धा त्यांनी मात्र लहानपणापासूनच बाबासाहेबांचा एक मूलमंत्र कायम मनी बाळाला तो म्हणजे शिका संघर्ष करा आणि संघटित व्हा. या विचाराप्रमाणे त्यांनी दहावीपर्यंत आपलं शिक्षण आपल्या गावातीलच मोहता विद्यालयात पूर्ण केल व पुढील शिक्षणासाठी त्यांनी तालुक्याच्या ठिकाणावरील कॉलेजमध्ये आपलं बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून नंतर आयटीआय कॉलेज खामगाव येथे तंत्रशिक्षण घेऊन रोजगाराच्या शोधात सन १९९७ मध्ये मुंबई गाठले तिथे सकाळी नाक्यावर मिळेल ते काम करून संध्याकाळीसिक्युरिटी गार्ड मध्ये काम करत असत.मुंबईला पाहिजे तसा कामाचा जम बसत नसल्या मुळे त्यांनी खढख करून पुणे गाठले पुढे सन २००० मध्ये त्यांना भारत फोर्जे कंपनीमध्ये जॉब मिळाला २००१ ते २००५ मध्ये टाटा मोटर्स कंपनीमध्ये चांगले काम मिळाले ते करून डोअर टू डोअर जाऊन शालेय साहित्य लहान मुलांची खेळणी तसेच घरगुती सामान याची विक्री केली. कामावरून आल्यावर दररोज चार तास हे काम करायचं त्यात कुठलाही कमीपणा न बाळगता. या कामात त्यांना आपले लहान भाऊ शाम वाकोडे यांची सुद्धा वेळोवेळी सहकार्य लाभलं त्यामुळे त्यांना फारशी अडचण आली नाही.पुढेतत हसतमुख चेहरा आणि दयाळू वृत्तीचे जिगरबाज संतोष भाऊ यांचा मित्र वर्ग ही खूप वाढत गेला. प्रत्येकाशी सन्मानजनक आदरपूर्वक वर्तुंकीमुळे ते प्रत्येक व्यक्तीला आपलंसं करून मैत्री निर्माण करतात. त्यांच्या कामातील प्रामाणिकपणा , विश्वासू वृत्तीआणि सातत्य यामुळे त्यांना कंपनीला ५ वर्ष म्हणून नोकरी गेली. हे काम करत असताना त्यांनी सामाजिक बांधिलकी जपून समाजातील अनेक छोट्या मोठ्या कार्यक्रमाला आर्थिक हातभार लावत गावातील सार्वजनिक संत तुकाराम महाराज स्मशानभूमी बांधकामाकरिता आर्थिक सहाय्य केले. आपल्या गाव खेड्यातील अनेक गावात बुद्ध विहार बांधकामाकरिता आर्थिक सहाय्य केलं. अनेकांच्या सुखदुःखात ते धावून जातात. समाजातील गरीब व्यक्तीला अडचणीच्या काळात सुद्धा मदत करीत असतात. संतोष भाऊ यांनी कोरोना काळात गरिबांना शेकडो किराणा किटचे मोफत वाटप केले.आपण काम मागणारे नव्हे तर काम देणारे झालो पाहिजे हा विचार मनात घेऊन त्यांनी पुणे (चाकण) येथे आपली स्वतः ची आयडियल अँड कंपनीची सन २०११ मध्ये लहान भाऊ श्याम यांनी स्थापना केली. त्यावेळी त्यांच्यासोबत एक पार्टनर होते .पण त्यांनीही कंपनीमध्ये सोडून राजीनामा दिला ते सोडून गेल्यामुळे त्यांनी आपल्या मोठया भावाला ५०% चा पार्टनर डायरेक्टर केले. त्यावेळी त्यांच्या कंपनीचा वार्षिक उलाढाल ३६ लाख होते. त्यांनी शून्यातून विश्व निर्माण करत केलेली आपली प्रगती माझ्यासह गावकऱ्यांना आदर्शवत होय. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना २०१९ मध्ये मलकापूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक या संस्थेच्या वतीने समाजभूषण हा पुरस्कार देऊन सन्मानित



केल्या गेले, तसेच आंबेडकरी चळवळतील गायक वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त औरंगाबाद मराठवाडा विद्यापीठ येथे सुद्धा त्यांना समाजभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. झोपडी जन्मलेले संतोष वाकोडे आपल्या अंग मेहनतीच्या जोरावर आपलंही स्वतःचं हक्काचं एक चांगलं घर असावं म्हणून त्यांनी वडनेर भोलजी येथे एक प्रचंड मोठ देखने चार मजली घर बांधून संपूर्ण समाज बांधव मित्रपरिवार आणि नातलगांना बोलावून भोजनदानाचा कार्यक्रम घेतला. चाकण पुणे येथेही त्यांचे एक घर,ऑफिस, वर्कशॉप आहे. असा त्यांच्या कंपनीचा दर्जा आहे. त्यांची आयडियल कंपनी ही आय एस ओ आहे . आज त्यांच्या कंपनीची वार्षिक उलाढाल चार ते पाच करोड पर्यंत असून लाखो प्रकारचं प्रॉडक्ट क्वालिटी सहित मोठमोठ्या कंपनीला ते मशनरी साहित्य पुरवतात. चाकण, औरंगाबाद या सर्व कंपनींना संतोष भाऊ वाकोडे यांची आयडियल अँड कंपनी डायरेक्ट व्हेंडर आहे. अशा प्रकारे संतोष भाऊ वाकोडे यांनी आपला प्रगतीचा उंच शिखर गाठला असून ते आपली एक सामाजिक बांधिलकी म्हणून त्यांनी चाकणमध्ये आता जाहीर केले आहे विदर्भाच्या कोणत्याही व्यक्तीला काहीही प्रॉब्लेम आल्यास २४ तास केव्हाही संपर्क करावा काही सोशल वर्क करणाऱ्या मित्राच्या सोबतीत चाकण हेल्प कम्युनिटी या नावाने एक संस्था निर्माण करून ते अनेकांना अडचणीच्या काळात मदत करतात. जणू काही बहुजन हिताय... बहुजन सुखाय... या विचाराला प्रत्यक्ष कृतीत उतरवण्यासाठी झपाटलेल्या संतोष भाऊ वाकोडे यांना आज त्यांच्या ४८ व्या वाढदिवसानिमित्त खूप खूप आभाळभर शुभेच्छा. त्यांना निरोगी आरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करूया...

**********

पत्रकार- सिद्धार्थ तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा
जि. बुलढाणा
मो. नं.९३०९७६७३८८

# वसा साने गुरुजींच्या विचारांच्या प्रसाराचा,राष्ट्र घडविण्याचा

स्मारकात वर्षभर विविध शिबिरे घेतली जातात. त्यामध्ये युवक आणि विद्यार्थ्यांना शिस्त आणि मेहनतीचे धडे दिले जातात. त्यायोगे त्यांच्यात स्वभान आणि समाजभान याची जाणीव निर्माण केली जाते.

रायगड : 'श्यामची आई'चे लेखक म्हणून अवघ्या मराठी जगतामध्ये लोकप्रिय असणाऱ्या साने गुरुजींनी अनेक धडपडणारी मुले घडवली, मानवतेचा सर्वत्र प्रसार केला आणि आंतरभारतीच्या माध्यमातून विविध भाषकांना जोडण्याचे प्रयत्न केले. त्यांच्या या कार्याचा वसा घेतलेले कार्यकर्ते आपापल्या परीने त्यांचे काम पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातूनच रायगड जिल्ह्यामधील वडघर येथे 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक' उभे राहिले असून नवीन पिढी घडवण्याचे काम पोटतिडकीने केले जात आहे.

ने गुरुजींचा मानवतेचा मंत्र आणि आंतरभारतीची संकल्पना यांचा प्रसार करण्याचे काम राष्ट्र सेवा दल आणि साधना प्रकाशनाकडून केला जात आहे. त्या कार्याला गती देण्यासाठी राजगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात वडघर येथे 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक' गेल्या २५ वर्षांपासून काम करत आहे. मुख्यत: युवकांना घडवण्याचे, त्यांच्यामध्ये आधुनिक मूल्ये बिंबवण्याचे काम अव्याहतपणे सुरू आहे. युवक आणि विद्यार्थ्यांमध्ये स्वभान ते समाजभान निर्माण करण्याचे कार्य या स्मारकाच्या माध्यमातून केले जात आहे. त्याशिवाय आंतरभारतीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून विविध भाषांमधील साहित्यांचा अनुवाद करून देशविदेशांतील वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून केले जात आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र तसेच गुजरात, कर्नाटक यांसारख्या राज्यांमध्ये अनेक मेळावे घेतले गेले. सर्व भाषांतील साहित्याच्या प्रकाशनासाठी तसेच लेखक, कवी, विचारवंतांना एक व्यासपीठ मिळावे म्हणून साहित्य अकादमीसारखी स्वायत्त संस्थाही पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या काळात उभी केली. पण साने गुरुजींची ही संकल्पना महाराष्ट्र सरकार किंवा खासगी संस्था व्याख्याने आणि मेळाव्यांपलीकडे नेऊ शकल्या नाहीत. ही कमतरता भरून काढण्यासाठी वडघर येथे 'साने गुरुजी राष्ट्रीय सामारका'ची मुहूर्तमेढ रोवली गेली.

साने गुरुजींच्या जन्मशताब्दी वर्षात म्हणजे १९९९ साली गुरुजींच्या साहित्य आणि विचारांवर प्रेम करणारे प्रकाशभाई मोहाडीकर, गजानन खातू, यशवंत क्षीरसागर, साने गुरुंजीच्या पुतणी सुधाताई बोडा, तुलसी बोडा, ज्येष्ठ कवी अर्जुन डांगळे, सुधीर देसाई, उमेश कदम यांच्यासारके कार्यकर्ते मधुकरराव चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली एकत्र आले. त्या वेळी पालगड येथील साने गुरुजींच्या वास्तूचे स्मृतिभवन करण्याचा ठराव मांडला गेला. पण गजानन खातू यांना साने गुरुजींच्या नावाने राष्ट्रीय पातळीवरचे काम व्हावे असे वाटत होते. त्यासाठी जागा शोधणे, निधी उभा करणे अशा कामांसाठी अमोल पालेकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्मारक समिती स्थापन करून युवा शिबीर, अभिवादन यात्रासारखे उपक्रम सुरू करण्यात आले.

कविवर्य कुसुमाग्रज, मृणालताई गोरे, भाई वैद्या, पन्नालाल सुराणा यांच्यासारख्या लेखक-कार्यकर्त्यांचा पाठिंबा लाभलेल्या या उपक्रमात हळूहळू अनेक संस्था आणि त्यांचे कार्यकर्ते सहभागी झाले. पुढे मुंबईमधील शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेल्या एक-एक रुपयाच्या देणगीतून उभ्या राहिलेल्या पैशांमधून माणगावजवळील वडघर येथे ३६ एकर जमीन विकत घेतली गेली. सुरुवातीला तीन खोल्यांच्या एका कौलारू घरात 'साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्ट' उभे राहिले. पुढे या जमिनीवर मोठे केंद्र उभे करण्याचा आराखडा तयार करण्यात आला. त्याला मूर्त रूप देण्यासाठी लागणारा पैसा कुठून आणायचा हा प्रश्न होताच. त्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख आणि अर्थमंत्री जयंत पाटील यांनी सहयोग दिला. स्मारकातील युवा भवनामार्फत निरनिराळ्या युवा शिबिरांचे आयोजन केले जाते. यात युवा छावणी शिबीर, अभिव्यक्ती शिबीर आणि प्रेरणा प्रबोधन शिबिरांचा समावेश असतो. दरवर्षी दहा हजारांहून अधिक विद्यार्थी, युवक या शिबिरांमध्ये सहभागी होतात.

युवा छावणी शिबीर स्मारकाच्या माध्यमातून दरवर्षी उन्हाळ्यात



१ ते ७ मे या कालावधीत युवा छावणी शिबिराचे आयोजन केले जाते. त्यात महाराष्ट्रातील विविध भागांमधून येणाऱ्या १७ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश असतो. शिबारार्थीच्या निवास, भोजनाची व्यवस्था संस्थेमार्फत केली जाते. वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञांमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते. युवकांमध्ये स्वभान ते समाजभान निर्माण करणे हा या युवा छावणी शिबिराचा उद्देश असतो. विचारांच्या पेरणीबरोबरच श्रम सहयोगाचे महत्त्व तरुणांना पटवून दिले जाते. नाटक, साहित्य, मानसशास्त्र, समाजवाद, विज्ञान, स्त्रीवाद, संविधान, तर्कवाद यांसारख्या विषयांवर प्रभुत्व असलेल्या तज्ज्ञांना बोलवून युवकांमध्ये वैचारिक घुसळण घडवून आणली जाते.

अभिव्यक्ती शिबीर अभिव्यक्ती शिबिरात १० ते १४ वयोगटातील विद्यार्थी सहभागी होतात. पाच दिवसांच्या या शिबिरात मुलांच्या अभिव्यक्तीला चालना देण्याचा प्रयत्न केला जात असतो. मुले स्मारकातील बिनभिंतीच्या शाळेत पूर्वी कधीही न अनुभवलेल्या गोष्टी शिकतात. शेतीकाम, कुंभारकामांचा अनुभव घेतात, निसर्गाची सफर, आकाश दर्शन, अभिनय, मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण या शिबिरातून दिले जाते.

प्रेरणा प्रबोधन शिबिर दिवाळीनंतर तीन महिने स्मारकात प्रेरणा प्रबोधन शिबिरांचे आयोजन केले जात असते. पुणे, नाशिक, रायगड, मुंबई या जिल्ह्यांमधील २५ ते ३० शाळांमधील १३ ते १४ वयोगटातील विद्यार्थी या शिबिरात सहभागी होत असतात. मुलांच्या मनात परिवर्तनावादी विचारांचे रोपटे रुजवण्याचे काम या माध्यमातून केले जाते. महाराष्ट्रातील कुठलीही शाळा या अडीच दिवसांच्या शिबिरात सहभागी होऊ शकते. मुलांना शिस्त आणि स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न या शिबिराच्या माध्यमातून केला जात असतो. या शिबिरासाठी स्वयंसेवक म्हणून काम करणारे कार्यकर्ते हे स्मारकात छावणी शिबीर पूर्ण केलेले तरुण असतात.

आंतरभारती अनुवाद केंद्र पाश्चात्त्य देशातील अनेक लेखक अनुवादाच्या मार्फत भारतीय वाचकांपर्यंत पोचले आहेत. पण विविध भारतीय भाषांत साहित्यनिर्मिती करणारे समर्थ लेखक सर्वसामान्यांपर्यंत आजही सहज पोहोचत नाहीत. त्यासाठी भाषेचा पूल बांधणे आवश्यक होते. यासाठी संस्थेच्या माध्यमातून आंतरभारती अनुवाद केंद्राची सुरुवात करण्यात आली. रामदास भटकळ यांच्या संकल्पनेतून हे अनुवाद केंद्र सुरू झाले. आज साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टचा अत्यंत महत्त्वाचे उपक्रम म्हणून हा ओळखला जात आहे. सुरुवातीला केवळ अनुवादासाठी सुविधा निर्माण करण्याचे काम करण्याचा मानस असलेल्या या केंद्राने पुढे चांगले अनुवाद व अनुवादक तयार करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावले टाकायला सुरुवात केली.

कोणत्याही देशाची, प्रांताची संस्कृती म्हणजे केवळ धर्म आणि कर्मकांडे नसतात तर त्या संस्कृतीत आपले साहित्य, तत्त्वज्ञान, शिल्पकला, चित्रकला यांसारख्या विविध कला आणि लोककला, विविध प्रकारचे संगीत आणि भाषेचाही समावेश असतो. हे विसरत चाललेल्या समाजात सध्या आपण राहतो आहोत. अशा काळात या देशाच्या सांस्कृतिक वस्त्राची वीण उसवत जाणे स्वाभाविक आहे. ही वीण अधिकाधिक घट्ट करण्यासाठी आंतरभारतीसारखे उपक्रम मोलाचे ठरत आहेत.

महत्त्वाची बाब म्हणजे ही गरज साने गुरुजींनी स्वातंत्र्यपूर्व काळातच ओळखली होती. त्यामुळेच त्यांनी सुरुवातीला प्रांतभारतीची आणि नंतर आंतरभारतीची कल्पना मांडली. प्रत्येक प्रांताबरोबर बदलणारी खाद्यसंस्कृती असेल की वस्त्र-प्रावरणातील विविधता असेल, नृत्यातील पदलालित्य असेल की संगीतातील रागदारी असेल या साऱ्यालाच एका धाग्यात बांधण्याचा प्रयत्न 'साने गुरुजी स्मारका'च्या माध्यमातून केला जात असल्याचे संस्थेचे अध्यक्ष प्रमोद निगुडकर सांगतात. साने गुरुजींनी मांडलेला आंतरभारतीचा विचार या देशात रुजायला हवा. त्याची चळवळ बनायला हवी. लोकांपर्यंत हे काम पोचायला हवे. यासाठी समाजानेही दातृत्व भावनेने समोर यायला हवे.

## सण आणि जयंती

नियमित नेहमीच येतात सण
तितक्याचं काळापुरती आठवण
देखावे, आश्वासने, वाटोळं धन
विसरून जातात आनंदी क्षण
आम्ही तरी करावे काय
एक गेला कि एक सण
परत त्यात महापुरुषांच्या जयंती
पुढच्याची तेच तेच आश्वाण
देवालाही इतका कंटाळा आला
अन्याय रोखण्यासाठी येत नाही
अत्याराचात दुर्गाही धावून येत नाही
मन दूषित, मनात भक्ती नाही
आत्महत्या, खून बलत्कार, शोषण
रोजच बातमी वाचत अससात
दुसरीकडे घडतयं आपण सुरक्षित
स्वतःच्या खुशीत आनंदित जगतात
पुढारी सत्तेसाठी, व्यपारी धनासाठी
संत, बाबा, महाराज, सन्याशी,
पैसे घेऊन माया जमवाण्यासाठी
समाजसेवक कार्यकर्ता लुबाडण्यासाठी
आता सांगा माणसासाठी उरलं कण?
माणसा माणसा तूच जागा हो
माणुसकी मारून जगणारे कोण?
ओळखून त्याचा तूच काळ हो
सण आणि जयंती साजरी कर
सत्य असत्य काय ते पारख कर
हेच जर मुळावार येतं असेल
काय करायचं ते तूच विचार कर
इंजि. नागनाथ कलवले, लातूर
या जगी कोणी नाही कोणाचे
हें बोल आता खरे वाटत आहेत
अश्रु अन दुःख मनात दटात आहेत
ऱ्हादयाला सारखे टोचत आहेत
*********
इंजि. नागनाथ कलवले, लातूर

# जिल्ह्यात २६ सप्टेंबरपर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : – कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत १२ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते २६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे. जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# बदलत्या वातावरणात नाक जाम होऊन बसते, 'हे' घरगुती उपाय एकदा करून पहाच

सध्या ऊन आणि पावसाचा खेळ आपल्याला रोज बघायला मिळतो. या बदलत्या हवामानामुळे नाक बंद होणे ही एक सामान्य समस्या आहे. हिवाळ्याची सुरुवात असो किंवा पावसाळा, तापमानातील बदलामुळे शरीरातही अनेक बदल दिसू लागतात. काही वेळेस तर आपल्याला आजार होऊन बसतात. त्यापैकी नाक जाम होणे. नाकातील अडथळ्यामुळे आपल्याला श्वास घेण्यास त्रास होतो आणि डोकेदुखी आणि अस्वस्थता यासारख्या समस्या देखील उद्भवू लागतात. जरी ही समस्या बारी करण्यासाठी अनेक औषधे उपलब्ध असली तरी, घरगुती उपचार देखील बरेच प्रभावी ठरू शकतात. चला जाणून घेऊया काही सोपे आणि प्रभावी घरगुती उपाय जे तुमचे ब्लॉक झालेले नाक उघडण्यास मदत करू शकेल. वाफ घ्या जर तुमचे नाक जाम झाले असेल तर या समस्येवर स्टीम इनहेलेशन ही सर्वात जुनी आणि प्रभावी पद्धत आहे. सर्वप्रथम एका भांड्यात गरम पाणी घ्या आणि त्यात निलगिरी किंवा पेपरमिंट तेलाचे काही थेंब घाला. यानंतर, टॉवेलने डोके झाकून १०–१५ मिनिटे वाफ घ्या. यामुळे तुमचे नाक साफ होईल आणि तुम्हाला त्वरित आराम मिळेल. मीठ आणि पाण्याचा गुळणा करा नाक बंद होण्यासोबतच घसा सुद्धा खवखवला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत मिठाच्या पाण्याने गुळणा करणे फायदेशीर ठरते. कोमट पाण्यात अर्धा चमचा मीठ मिसळा आणि दिवसातून २–३ वेळा गार्गल करा. हे घशातील सूज कमी करते आणि नाकातील अडथळे दूर करण्यास देखील मदत करेल. गरम पाणी प्या गरम पाणी प्यायल्याने शरीराला आतून आराम मिळतो आणि नाक बंद होते.

# बिल्डरचा हलगरजी पणा आणि महानगर गॅसच्या गलथान कारभारामुळे जनतेची एकच धावपळ

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नेरूळ सेक्टर – २४ नवी मुंबई येथील समता को–ऑप हाऊसिंग सोसायटी पुनर्विकास चे काम ( टी पी व्ही विश्वकर्मा बिल्डर ) यांचे कडून खोदकाम काम चालू असताना बिल्डरच्या हलगरजी पणामुळे महानगर गॅस पाईप लाईन फुटल्याने हजारो लिटर गॅसची गळती झाली, त्यामुळे संबंधित विभागात मोठ्या प्रमाणात गॅसची दुर्गंधी पसरली होती, स्थानिक विभागातील लोकांचा जीव टांगणीला लागला होता, जीवितहानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होण्याचीशक्यता होती, गॅसची पाईपलाईन फुटून जवळजवळ दीड ते पावणेदोन तास झाल्यानंतर घटनास्थळी महानगर गॅसची गाडी, अधिकारी व कर्मचारी उशिरा पोहोचले तत्पूर्वी स्थानिक नेरूळ पोलीस व फायर ब्रिगेड यांची गाडी पण घटनास्थळी पोहोचल्यामुळे पुढील अनर्थ टळला. त्यावेळी स्थानिक रहीवाशी चंद्रकांत कांबळे ( उपशहर प्रमुख शिवसेना नवी मुंबई ) यांनी वेळेचे भान ठेवून सर्व यंत्रणाना फोन करून होणारी दुर्घटना टाळण्याचा ऑटोकाठ प्रयत्न केला किंबहुना दुर्घटना टळली त्यामुळे विभागातील लोकांनी सुटकेचा श्वास सोडला. त्यावेळी उपस्थित गणेश भगत, रमेश नरवडे, आवारे, रोजरिओ मॅडम, जाधव, सचिन पारकर इत्यादी स्थानिक लोक उपस्थित होते, अशी माहीती घटनास्थळी उपस्थित पत्रकार : कल्याणराव हनवते यांनी दिली.



# नवी मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी यांची तात्काळ बदली करा - ॲड. उमेश हातेकर

नवी मुंबई / के. एच. हनवते:– सीवूड्स सेक्टर ५० जुने येथील नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ ( सी.बी.एस.ई ) शाळेचा होत असलेला भोंगळ कारभार वंचित बहूजन आघाडी सीवूड्स विभाग अध्यक्ष ड. उमेश हातेकर यांनी उघड केला. शाळेच्या विविध तक्रारी बाबत वंचितने धडक मोर्चा दिनांक ०२ गस्ट २०२४ ला नवी मुंबई शाळा क्र ९३ ( सी.बी.एस.ई ) शाळा ते नवी मुंबई महानगरपिलिकेच्या मुख्यालयावर काढाला होता. त्यावर कोणतीच कारवाई पालिकेने केली नसुन लेखी पत्र देत बोळवण केली. वारंवार वंचितच्या वतीने सुचना करून पण जर १ महिन्यात मागण्या मान्य केल्या नाही तर आयुक्तांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर सुद्धा पालिका कोणतीच कारवाई करताना दिसली नाही म्हणून परिणामी वंचित ने दि.२९ गस्ट २०२४ रोजी आयुक्तांच्या दालनाबाहेर ठीय्या आंदोलन केले. शाळेतील सन २०२२– २३ सालचे पालकांनी स्वतः खर्च करुन आपल्या पाल्यांना शालेय वस्तु व गणवेश घेतले होते. एकुण ८६६ पालकांनी पाल्याला खरेदी केलेले बिले शाळेत जमा केली. शाळेनी त्या बिलांची एक्सेल फाईल बनवून पालिकेला पाठवली व ८६६ जणांचे एकुण = २६,७१,९३१ /– रुपये पालिका पालकांना देणे आहे. परंतु नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्र. ९३ ( सी.बी.एस.ई ) शाळेच्या आणि शिक्षण विभागाच्या कामचुकारपणा मला आजतागायत २ वर्षे होऊन सुध्दा पालकांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले नाही. सदरील प्रकरणाची सर्व माहिती घेतली असता शिक्षणाधिकारी मा.अरुणा यादव ह्या शाळेंनी विद्यार्थ्यांच्या बँक डिटेल्स अकांऊट नंबर चुकीचे दिले आहेत असे म्हणत आहेत. तर शाळा आमच्याकडे काही नाही पालिकेकडुन पालकांना पैसे येत नाही असे सांगत आहेत. या सर्व बाबींमध्ये पालकवर्ग मात्र भरडला जात आहे. शाळेच्या व शिक्षण विभागाच्या चालढकली मुळे पालकांनी त्यांच्या पाल्यांसाठी काढलेली बँक अकाऊंट सुद्धा ६ महिने कोणतीच बँक ट्रान्साक्शन न केल्याने बंद पडली आहेत. यासर्व प्रकरणात शिक्षणाधिकारी यांनी कामचुकार पणा केल्याने त्यांची बदली करण्यात यावी तसेच प्रत्येक वर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा विद्यार्थ्यांना शालेय गणवेश दिले नाहीत, पुस्तके दिली नाहीत, शालेय साहित्य दिले नाहीत, ओळखपत्र दिले नाहीत वेळो वेळी पाठपुरावा करुन सुद्धा पालिका कोणतीच कारवाई करत नसल्याने संबधित अधिकाऱ्यांची सुद्धा चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडी सीवूड्सचे विभाग अध्यक्ष – ड. उमेश हातेकर यांनी महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचे प्रधान सचिव आणि नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली.



## जलकुंभ परिसरात वृक्षारोपण



लातूर –––आज दिनांक १२/०९/२४ रोजी दुपारी स्वामी विवेकानंद जलकुंभ परिसरात लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , शहर महानगरपालिका अभियंते श्री पठाण , स्वामी विवेकानंद जलकुंभ प्रमुख दिलीप गायकवाड,पत्रकार राजेन्द्र कांबळे,यांच्या हस्ते राम फळ,अशोक,लीबोणी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले यावेळी भ्रमानंद गायकवाड, सौदागर हणमंते,ईश्वर बंनसटवार इत्यादी उपस्थित होते

# लातुरात संसर्गजन्य आजारावर दोन दिवसीय मराठवाडा पातळीवरील परिषदेचे आयोजन

लातूर : लातुरात दि. १४ व १५ सप्टेंबर २०२४ रोजी संसर्गजन्य आजारावरील दोन दिवसीय मराठवाडा पातळीवरील परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेस सीआयडीएस अर्थात क्लिनिकल इंफेक्टियस डिसीजेस सोसायटी, इंडियाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीनेही मान्यता दिली आहे. संसर्गजन्य आजारांवर मराठवाडा पातळीवर होणारी ही पहिलीच परिषद आहे. या परिषदेचे उदघाटन आ. अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदयसिंह मोहिते – पाटील, माजी सीपीएस प्रेसिडेंट तसेच माजी नॅशनल मेडिकल कौन्सिल मेंबर डॉ. गिरीश मैंदरकर, एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जमादार आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. ही परिषद जरी मराठवाडा पातळीवरील होत असली तरी या परिषदेस मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातील तज्ज्ञ डॉक्टर्ससह मराठवाड्याबाहेरील सोलापूर, गुलबर्गा आदी भागातील डॉक्टर्सही सहभागी होणार आहेत. आयएमएच्या संयोजनाखाली पार पडणाऱ्या या परिषदेचे आयोजन विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि विवेकानंद हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

यावेळी आयएमए लातूरचे अध्यक्ष डॉ. उमेश कानडे,सचिव डॉ. गणेश बंदखडके, यांसह डॉ.अभय कदम, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. हर्षवर्धन राऊत, डॉ. राजकुमार दाताळ , डॉ. राजेश एनाडले , डॉ. घनःश्याम दरक, डॉ. सदानंद कांबळे, डॉ. ज्ञानेश्वर पांचाळ, डॉ. अमोल लोंढे, डॉ. ऋषिकेश हरिदास, डॉ. विकास सोळुंके, डॉ. सौ. विमल डोळे, डॉ. सौ. क्रांती साबदे, डॉ. श्वेता काटकर, डॉ. प्रतिभा केंद्रे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती लाभणार असल्याची माहिती संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. संतोष कवठाळे , सचिव डॉ. संगमेश रविशंकर चवंडा यांनी दिली.

# पुऱ्या पापडासारख्या कडक होतात का? पिठात या गोष्टी टाका, मग ते फुग्यासारखे फुगेल

घरी जेव्हा जेव्हा जेवणाचे ताट तयार केले जाते तेव्हा पुऱ्या नक्कीच बनवतात. गरम तेलात तळलेल्या पुरणपोळ्या खाणाऱ्यापर्यंत पोहोचतात, मग थालीपीठाविषयी काय बोलणार. पण सर्वात मोठी अडचण तेव्हा येते जेव्हा कढईत जाणाऱ्या पुऱ्या फुगण्याऐवजी पापडासारख्या कडक बाहेर येतात. पुरी फुगल्या तर त्यांची चव किंवा थालीपीठाची शैली खराब होत नाही. अशा परिस्थितीत, मला माझी आई किंवा आजी आठवते, ज्यांच्याकडे फुगलेल्या पुरीची काही रेसिपी होती, जी नेहमीच परिपूर्ण होती. पण आजी आणि माता प्रत्येक ठिकाणी त्यांच्यासोबत येऊ शकत नाहीत, म्हणून आम्ही तुम्हाला अशा २ गुप्त गोष्टी सांगत आहोत, ज्यामुळे तुमच्या पुऱ्या तर फुगतीलच पण चवही अनेक पटींनी वाढेल. जर तुम्हाला मऊ आणि मऊसर पुरी बनवायची असतील तर या गोष्टी लक्षात ठेवा जेव्हा तुम्ही पुरीसाठी पीठ मळून घ्याल तेव्हा कोरड्या पिठात २ गुप्त घटक घाला. या गुप्त गोष्टी म्हणजे साखर आणि थोडा रवा.



पीठ मळताना कोरड्या पिठात मीठ, थोडी सेलेरी, पिठीसाखर आणि अर्धी वाटी रवा घाला. रवा घातल्याने तुमच्या पुऱ्या खुसखुशीत आणि कुरकुरीत होतील. तुमच्या पुरीची चव साखरेने दुप्पट होईल. पुऱ्याही फुगतील. तुमच्या पुऱ्या मऊ व्हाव्यात असे वाटत असेल तर पीठ मळताना तुमचे सर्व लक्ष केंद्रित करावे. पुऱ्यांसाठी पीठ जितके घट्ट होईल तितक्या पुरी वाढतील. पुष्कळदा पीठ सैलसर मळले तरी पुरी कडक आणि फुगलेली होते.

## अंबर यांची लातूर तालुका पुरवठा निरीक्षकपदी नियुक्त तहसील कार्यालयात सत्कार.




लातूर :– लातूर तहसील कार्यालयात कार्यरत अभ्यासू गजानन महावीर अंबर यांची शासनाच्या वतीने लातूर तालुका पुरवठा निरीक्षक पदी नियुक्त केल्याबद्दल लातूर येथील सामाजिक कार्यकर्ते महेंद्र कांबळे व त्यांच्या मित्र परिवाराकडून शाल,श्रीफळ, व पुष्पगुछ देऊन तसेच पेढे वाटून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी रुपेश गायकवाड, शेख जावेद, परमेश्वर कांबळे, आयुब बागवान, महादेव गिरी, रत्ननपा कुर्डे, शेख अल्ताफ, उत्तम कांबळे, गौतम साबळे, देवा कांबळे,गौस मणियार, प्रेमनाथ अंकुशे आदी मोठया संख्येने उपस्थित होते.

## तेरणा नदी काठाच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

लातूर :– निम्न तेरणा धरणाची (माकणी धरण) पाणी पातळी ६०३.५५ / ६०४.४० मीटर असून धरणातील उपयुक्त पाणीसाठा ७५.३१ टक्के आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात येणाऱ्या येव्यामुळे (इन्फ्लो) धरण निर्धारित पातळीस भरण्याची शक्यता आहे. त्यानंतर धरणात येणारा येवा तेरणा नदीमार्गे सोडावा लागणार आहे. त्यामुळे तेरणा नदी काठावरील शेतकरी,नदीकाठी वस्ती करुन राहीलेले नागरिक यांनी सतर्क राहावे, जेणेकरुन जिवीत व वित्त हानी होणार नाही, असे लातूर पाटबंधारे विभाग क्र. १ चे कार्यकारी अभियंता अ. न. पाटील यांनी कळविले आहे.

# भारतातील 'या' गावात प्रत्येक घरात येतात जुळी मुले जन्माला; शास्त्रज्ञांनाही सापडले नाही कारण

जगात अशा अनेक रहस्यमय गोष्टी आहेत ज्यांचे सत्य अजून उलघडलेले नाही. संशोधकांना देखील अनेक गोष्टींचे रहस्य माहिती नाही. अशा अनेक घटना आहेत ज्या आपल्याला आश्चर्यचकित करतात. भारतात असेच एक गाव रहस्याने भरलेले आहे जे केरळमध्ये आहे. या गावात प्रत्येक घरात जुळी मुले जन्माला येतात. गावातील सगळ्या घरांमध्ये जुळी मुली जन्माला येणे ही सामान्य बाब नाही. मात्र यामागील सत्य कोणालाच कळू शकलेले नाही. संशोधक देखील यामागच्या रहस्याच्या शोधात अजूनही आहे. गावात ५५० जुळी मुले मिळालेल्या माहितीनुसार, केरळमधील मलप्पुरम जिल्ह्यातील कोडिन्ही गावात असे घडले आहे. या गावात नवजात बालकांपासून ते ६५ वर्षांपर्यंतचे लोक तुम्हाला जुळे दिसतील. या गावातील बहुतांश लोक जुळी आहेत. अशीच माणसे तुम्हाला प्रत्येक घरात सापडतील. कोडिन्ही गावात २००० कुटुंबांपैकी सुमारे ५५० जुळी मुले येथे राहतात. या ठिकाणी लहान मुलापासून म्हताऱ्यापर्यंत सगळे जुळी दिसतात. मीडिया रिपोर्ट्सनुसार, २००८ मध्ये या गावात २८० जुळी मुले होती. गावातील बहुसंख्य मुले १५ वर्षांची आहेत. शाळांमध्ये देखील जवळपास ८० टक्के मुले एकाच शाळेत आहेत. यामुळे मुलांना ओळखणे कठीण होते. इथल्या प्रत्येक मेळाव्यात सारख्याच स्वरूपाची अनेक माणसं पाहायला मिळतील. भारतात जन्माला येणाऱ्या जुळ्या मुलांबद्दल बोलायचे म्हणले तर १००० पैकी फक्त ९ मुले जन्माला येतात. पण या गावात दर हजारामागे ४५ मुले जन्माला येतात. जुळी मुले जन्माला येण्यात नायजेरियाचे नाव पहिल्या क्रमांकावर येते. नायजेरियाच्या इग्बो–ओरामध्ये, १००० जुळ्या मुलांपैकी १४५ जन्माला येतात. २०१६ मध्ये संशोधक या गावात तपासणीसाठी गेले होते.



# घरच्या घरी हिरवी मिरची कशी पिकवता येईल ते जाणून घेऊया

हिरव्या मिरचीचा वापर प्रत्येक घरात मोठ्या प्रमाणात केला जातो. लोक भाज्या, मांसाहारी पदार्थ, सॅलड्स, स्प्राउट्स इत्यादींमध्ये याचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. हे डिश मसालेदार तर बनवतेच पण आरोग्यदायी देखील आहे. तुम्हाला अनेकदा हिरवी मिरची ५–१० रुपयांना मिळते किंवा भाजी मंडईतील भाजी विक्रेत्याकडून फुकट मिरचीही मिळते. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही घरी मिरचीचे रोप देखील लावू शकता. यामुळे तुम्हाला पुन्हा पुन्हा हिरवी मिरची खरेदी करण्याची गरज भासणार नाही. तुम्हाला पाहिजे तेव्हा तुम्ही तुमच्या बागेतून मिरची तोडून खाऊ शकता. घरच्या घरी हिरवी मिरची कशी पिकवता येईल ते जाणून घेऊया. घरच्या भांड्यात मिरची वाढवण्याची सोपी पद्धत प्रथम तुम्हाला काही मिरचीच्या बिया घ्याव्या लागतील. एका लहान भांड्यात माती टाकून ते शिंपडतो. आता त्यावर हलक्या मातीचा थर लावा. मिरचीच्या बिया १० ते ३० अंश सेल्सिअस तापमानात उगवतात. आता पाणी द्या आणि हे भांडे सूर्यप्रकाशात ठेवा. १५ दिवसांनंतर त्यातून लहान रोपे बाहेर येतील. ३० दिवसांनंतर हे आणखी वाढतील. आता ते लहान भांड्यातून बाहेर काढा आणि एका मोठ्या ग्रोबॅगमध्ये स्थानांतरित करा. वाढत्या रोपांसाठी ग्रोबॅग वापरणे चांगले. ४० टक्के शेणखत, ५० टक्के सामान्य माती आणि १० टक्के वाळू एकत्र करून पिशवीत टाका. आता त्यात मिरचीचे रोप व्यवस्थित लावा. रोपाला लहान भांड्यातून अशा प्रकारे काढा की त्याची मुळे तुटणार नाहीत. तुम्ही १२ इंचाच्या ग्रोबॅगमध्ये २ रोपे लावू शकता. सूर्यप्रकाशात ठेवा. आता त्यात पाणी घाला. जर तुम्ही हिवाळ्यात एखादे रोप वाढवत असाल तर ते सूर्यप्रकाशात ठेवा. ४० दिवसांनी वनस्पती वाढेल. वेळोवेळी मातीला कुदळ करत राहा जेणेकरून ऑक्सिजन मुळांपर्यंत पोहोचेल आणि झाडाची वाढ चांगली होत राहील. ५० दिवसांनंतर तुम्हाला दिसेल की, त्यातून फुले आणि मिरची दोन्ही बाहेर येऊ लागली आहेत. ६० ते ७० दिवसांनी वनस्पती चांगली परिपक्व होते. आता त्यात खत घाला.

# पिक विम्याचे ४ हजार दावे नामंजूर

**मंजूर दाव्यापैकी जेमतेम शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा, जिल्हाधिकारी, यांनी लक्ष देण्याची मागणी**

किनवट/शेख शौकत :-किनवट तालुक्यातील ४० हजार शेतकरी यांचा दावा पात्र असला तरी आजच्या परिस्थितीत असे कि शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर अजूनही पैसे जमा झाले नाहीत, त्यामुळे अशा शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. तेव्हा जिल्हाधिकारी व किनवट माहूरचे आमदार भीमराव केराम यांनी लक्ष देऊन पात्र शेतकऱ्यांना तातडीने पिक विमा मिळून द्यावा अशी मागणी शेतकऱ्याकडून केली जात आहे. २०२३ च्या खरीप हंगामात किनवट तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा अंतर्गत इन्शुरन्स कंपनीकडे पीक विमा काढला होता. राज्य शासनाने एक रुपयात विमा काढून दिल्याने प्रत्येक शेतकऱ्यांनी विमा उतरविला होता. जुलैमध्ये अति पाऊस झाल्यामुळे २५ टक्के अग्रीम म्हणून प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यावर रुपये जमा झाले. सप्टेंबरमध्ये अवकाळी पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांचा कापूस सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले. याबाबत अनेक शेतकऱ्यांनी दावा दाखल केला होता. पिक विमा कंपन्याचे अधिकारी शेतावर येऊन पंचनामा करून नुकसान भरपाईचे अर्ज भरून घेतले होते. दिनांक ३ आक्टोंबर २०२३ च्या आत शेतकऱ्यांनी दावा दाखल केला होता. असे शेतकरी पिक विमा लाभास पात्र असल्याचे पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्याकडून सांगण्यात येते. जवळपास चार हजार शेतकरी दावा दाखल करून सुद्धा अपात्र ठरले आहेत. याबाबत विमा कंपनीचे तालुका अधिकारी विजयकुमार निलगिरवार यांनी सांगितले की पात्र लाभार्थी असेल त्यांचे आधार प्रमाणीकरण व्हायचे आहे. तसेच त्यांनी आयडी क्रमांकासह तक्रार दाखल करावी तेव्हाच त्यांच्या खात्यावर पैसे जमा होईल. अन्यथा त्यांच्या खात्यावर पैसे जमा होईल कि नाही, हे सांगता येत नसल्याचे त्यांनी सांगितले.




# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीना अटक. स्थानिक गुन्हे शाखे ची कारवाई

लातूर :- खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीना अटक. स्थानिक गुन्हे शाखे ची कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे गातेगाव हद्दीतील दिंडेगाव पाटी परिसरात दिनांक १०/०९/ २०२४ रोजी किरकोळ भांडणावरून काही तरुणांनी मिळून लाकडी दांड्याने एका तरुणाच्या डोक्यात, तोंडावर मारहाण करून खून केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे गातेगाव येथे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास गातेगाव पोलीस करीत होते. सदरचा गुन्हा घडल्यापासून आरोपी फरार होते. ते आपले राहण्याचे ठिकाणे सतत बदलत असल्याने पोलिसांना मिळून येत नव्हते. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यासाठी मार्गदर्शन करून सूचना केल्या होत्या. पोलीस अधीक्षक सोमय मुंडे ,अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांचे नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्यात येत होता. दरम्यान सदर पथकाला मिळालेल्या गोपनीय व तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून नमूद गुन्ह्यातील दोन आरोपी रेनापुर फाटा ते दर्जी बोरगाव जाणाऱ्या रोडवर एका कॉम्प्लेक्स जवळ लपून बसल्याची असल्याची माहिती मिळाली. त्यावरून सदर पथक तात्काळ तेथे पोहोचून अतिशय सीताफिने नमूद गुन्ह्यातील संशयित आरोपींना दिनांक ११/०९/२०२४ रोजी ताब्यात घेऊन पोलीस ठाणे गातेगाव येथे आणले. पोलीस ठाणे गातेगाव येथे आणून सदर आरोपीना विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव ऋषिकेश अशोक लोमटे, वय २५ वर्षे, राहणार कासाराजवळा तालुका लातूर. तुकाराम साहेबराव यादव, वय २४ वर्षे, राहणार कासारजवळा तालुका जिल्हा लातूर असे असल्याचे सांगितले. त्यांना पोलीस ठाणे गातेगाव येथे दाखल असलेल्या खुनाच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. तसेच पोलीस स्टेशन गातेगाव यांनीही नमुद गुन्ह्यातील एक आरोपी नामे प्रीतम अण्णाराव हजारे, वय २१ वर्ष ,राहणार कासारजवळा याला पण अटक केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे गातेगाव चे पोलीस अमलदार पाटील हे करीत आहेत. सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात व स्थानीक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांचे नेतृत्वातील पथकातील पोलीस अंमलदार रामहरी भोसले, प्रकाश भोसले, राजेश कंचे, चालक पोलीस अंमलदार केंद्रे, सायबर सेलचे पोलीस अमलदार देवडे तर पोलीस स्टेशन गातेगाव चे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर सानप, पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोलीस अंमलदार शेख,गिरी, केंद्रे, पतंगे, गुराळे यांनी केली आहे.



# नवप्रवेशितांचे स्वागत व गुणवंतांचा सत्कार समारंभ संपन्न

मुरुड/ महेंद्र आल्टे : दिनांक ४ सप्टेंबर २०२४ रोजी संभाजी महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने बी.ए.प्रथम वर्षासाठी इतिहास विषयासाठी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताचा व इतिहास विषयाच्या सामान्य ज्ञान परीक्षेमधील गुणवंताचा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक काळम तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून इतिहास विभागाचे डॉ.राजेसाहेब भोसले उपस्थित होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले मान्यवरांच्या स्वागतानंतर बी. ए. द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बी.ए. प्रथम वर्षासाठी इतिहास विषयांमध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्यानंतर इतिहास विभागाने प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास विषयाचे सामान्य ज्ञान तपासण्यासाठी ऑनलाईन परिक्षा घेतली. या ऑनलाइन एम. सी. क्यू. परीक्षेमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली यामध्ये श्रीनिवास सावंत याने ५० पैकी ५० गुण, निखिल सावंत याने ५० पैकी ५० गुण तर अर्जुन चव्हाण या विद्यार्थ्याने ५० पैकी ४८ गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांचा स्पर्धा परीक्षेला उपयुक्त ठरणारा 'लक्षवेध' नावाचा ग्रंथ व गुलाब पुष्प देऊन प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक प्राचार्य डॉ.अशोक कळम यांनी स्पर्धा परीक्षेमधील 'इतिहास' विषयाचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रतिपादन करून स्पर्धा परीक्षेमध्ये यश मिळवायचे असेल तर अभ्यासामध्ये सातत्य ठेवले पाहिजे. कठोर परिश्रम करणे गरजेचे आहे याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.राजेसाहेब भोसले यांनी यशासाठी कष्ट करण्याची तयारी व जिद्द विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी बाळगणे आवश्यक आहे याची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे आभार बी.ए.तृतीय वर्षाची विद्यार्थिनी प्रतीक्षा काळे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिनकर रणदिवे यांनी केले. या कार्यक्रमासाठी इतिहास विषयाचे तीनही वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.




# मुस्लिम समाज यांचेमार्फत बांधण्यात येणाऱ्या सभागृहाला संरक्षक भिंत बांधणेसाठी रु. १ कोटी २५ लक्ष इतका निधी लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत उपलब्ध

**काम करत राहू,काम करतच राहणार- आ. शेखर निकम**



चिपळूण/ प्रतिनिधी :- चिपळूण तालुका मुस्लिम समाजामार्फत बांधण्यात येणाऱ्या सभागृहास संरक्षक भिंत बांधणेस लेखाशीर्ष २५१५ मधून निधी उपलब्ध व्हावा असे मुस्लिमबांधवांमार्फत आमदार शेखर निकम यांना निवेदन प्राप्त झाले होते कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांनी क्षणाचा विलंब न लावता आपलं कामास १००% निधी प्राप्त करून देऊ अशा शब्द दिला. चिपळूण-संगमेश्वर विधानसभा मतदारसंघातील चिपळूण येथील मुस्लिम समाज यांचेमार्फत बांधण्यात येणाऱ्या सभागृहाला संरक्षक भिंत बांधणे आवश्यक असून त्यासाठी रु. १ कोटी २५ लक्ष इतका निधी लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात यावा असे मा. उप-मुख्यमंत्री ना. अजितदादा पवार साहेब यांना तो प्राप्त व्हावा यासाठी पत्र देत पाठपुरावा करत सदर निधी मंजूर करून आणला. हा निधी मंजूर करून आणत सर्व समाजाला सोबत घेत मतदार संघाचा विकास आपण करतो हे सिद्ध केले तसेच त्याच पद्धतीने विकासासाठी आमदार शेखर निकम पायाला भिंगरी बांधून झटत आहेत. आपल्याला सर्व अगड - पगड जाती-धर्माला साथीला घेऊन मतदार संघाचा विकास करायवायचा आहे अन तो विकास आपणास मा. ना. उपमुख्यमंत्री विकासाचे महामेरू श्री. अजितदादा पवार साहेब यांच्या नेतृत्वाखाली करायचा आहे कारण शब्दाला पक्का असणारा नेता म्हणजे अजित दादा दादाचा वादा याचे मूर्तीमन उदाहरण म्हणजे हे काम आहे म्हणूनच त्यांच्या कायमस्वरूपी पाठीशी ठामपणे उभे राहू. १ कोटी २५ लक्ष इतका निधी लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत उपलब्ध झाल्याबद्दल आमदार शेखर निकम यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब,पालकमंत्री उदयजी सामंत , तसेच ग्रामविकास मंत्री महाजन साहेब महायुती सरकारचे मनःपूर्वक धन्यवाद मानले आहेत.

# स्वातंत्र्य सैनिक पाल्यांच्या न्याय मागण्यासाठी १४ सप्टेंबर पासून विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अन्न पाणी त्याग आमरण उपोषण

**अन्यथा १७ सप्टेंबर रोजी आक्रमक भूमिका घेणार - स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना**

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी :- आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव एकीकडे मोठ्या आनंदी उत्साही वातावरणात साजरा करत असताना ज्यांच्यामुळे स्वातंत्र्याचे दिवस बघायला मिळाले त्या स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या पाल्यांवर सरकार दुसरीकडे अन्याय करत आहे. स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यांच्या प्रलंबित मागण्यांना १३ सप्टेंबर पर्यंत न्याय मिळाला नाही तर स्वातंत्र्य सैनिकाची मुलगी शोभा अमरसिंग राजपूत रा. चाळीसगाव जिल्हा जळगाव या संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अन्नपाणी त्याग करून आमरण उपोषणाला बसणार आहेत. त्यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी स्वातंत्र्य सैनिक उत्तराधिकारी संघटनेचे महाराष्ट्रातील सर्व पदाधिकारी तसेच स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांचे पाल्य सहकुटुंब या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी येणार असल्याची माहिती उत्तराधिकारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष भाऊसाहेब सोळुंके यांनी दिली. यासंदर्भात दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांच्या पाल्यांच्या विविध मागण्या संदर्भामध्ये २९ सप्टेंबर २०२२ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळा समवेत व्यापक बैठक झाली. या बैठकीचे इतिवृत्तान्त तयार झाले. मुख्यमंत्र्यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निर्देश दिलेले असतानाही मागील दोन वर्षापासून एकही मागणी मान्य झालेली नाही. स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांच्या पाल्यांना महाराष्ट्र वगळता इतर राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात सवलती देण्यात येतात. प्रामुख्याने उत्तर प्रदेश, हरियाणा, उत्तराखंड, पंजाब, गोवा, बिहार,हिमाचल प्रदेश, दमण व दिव मध्ये नोकरीत तर आरक्षण आहेच याशिवाय देण्यात येणारी पेन्शन सन्मान जनक असून आरोग्य आणि शिक्षणामध्ये सुद्धा विशेष सवलत देण्यात येते. महाराष्ट्रात मात्र विद्यमान महायुतीच्या सरकारने उलट २८ ऑगस्ट २०२४ रोजी शासन आणि प्रशासनाने स्वातंत्र्य सैनिक नामनिर्देशित पाल्यांच्या नोकरीवर गदा आणणारा अन्यायकारक कठोर निर्णय घेतला आहे. या निर्णयाप्रमाणे आता ४ मार्च १९९१ चा शासन निर्णय कालबाह्य ठरविण्यात आला आहे. आता शासनाच्या या नवीन निर्णयामुळे स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्यांची शासकीय नोकरी जाणार आहे. महाराष्ट्रात ५ हजार पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर या निर्णयामुळे गंडांतर येईल. त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबांची संख्या लाखोच्या घरात जाईल. वास्तविक शासन सेवेमध्ये तीन वर्ष सेवा केली तरीदेखील नोकरीतून थेट काढून टाकण्याची प्रक्रिया सहज नाही. असे असताना सरकारने मात्र या ठिकाणी ज्या स्वातंत्र्यसैनिकांनी हा देश स्वतंत्र व्हावा यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली, आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवले त्यांच्या पाल्यांना बेघर करण्याचा अघोरी निर्णय या राज्य सरकारने घेतला आहे. शासनाने २३ जून २०२१ रोजी शासकीय परिपत्रक काढून सामान्य प्रशासन विभागाच्या विविध योजना आणि धोरणामध्ये सुधारणा प्रस्तावित करण्यासंदर्भात ४ मार्च १९९१ नुसार स्वातंत्र सैनिकांचे पाल्य यांना वर्ग ३ व वर्ग ४ पदभरती निश्चित केलेली आहे. सदरचे शासन परिपत्रक अधिक्रमित व रद्द झालेले नाही. त्यामुळे या परिपत्रकानुसार स्वातंत्र्य सैनिकांचे पाल्य यांची पदभरती प्रक्रिया राबवण्यात यावी. तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या २५ ऑगस्ट २००५ च्या परिपत्रकामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. स्वातंत्र्य सैनिक पाल्य व अनुकंप पाल्य यांना प्रादेशिक दुय्यम निवड मंडळ यांच्यामार्फत येण्यापासून सूट देण्यात आलेली आहे. ज्याप्रमाणे अनुकंपा तत्त्वावर वर्ग ३ व वर्ग ४ ची पदभरती करण्यात येते, त्याच धर्तीवर ४ मार्च १९९१ च्या परिपत्रकांवर निर्देशित केल्याप्रमाणे स्वातंत्र्यसैनिक यांचे पाल्य यांची पदभरती विशेष मोहीम म्हणून राबवण्यात यावी. असे आदेश अवर सचिव महाराष्ट्र शासन यांनी दिलेले असताना या नियमाला देखील सरकारने बाजूला ठेवून २८ ऑगस्ट २०२४ चा अन्यायकारक निर्णय लादला आहे.या निर्णयाच्या विरोधात तसेच स्वातंत्र्यसैनिक पाल्यांच्या विविध मागण्या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अन्न पाणी त्याग करून आमरण उपोषण करण्याचा निर्णय स्वातंत्र्यसैनिकाची मुलगी शोभा अमरसिंग राजपूत राहणार चाळीसगाव जिल्हा जळगाव यांनी घेतला आहे. या निर्णयाला आणि आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रातील असंख्य स्वातंत्र्यसैनिक या वयात आमरण उपोषण स्थळी येऊन बसणार आहेत. एवढेच नव्हे या स्वातंत्र्यसैनिकांचे हजारो पाल्य आपल्या कुटुंबासह आमरण उपोषण स्थळी पाठिंबा देण्यासाठी येऊन बसणार आहेत. जर सरकारने स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांच्या पाल्यांच्या मागण्यांची दखल घेतली नाही.त्यांना मानसन्मान दिला नाही तर १७ सप्टेंबरला संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या समोर ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांचे पाल्य आक्रमक भूमिका घेतील.काही अप्रिय घटना घडली तर त्यास सरकार जबाबदार राहील असा थेट इशारा भाऊसाहेब सोळुंके, प्रदेशाध्यक्ष स्वातंत्र्यसैनिक उत्तराधिकारी संघटना महाराष्ट्र राज्य यांनी दिला आहे.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE